**ठळक बातम्या**

- राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर, राज्यातल्या ७ जागांचा समावेश

- नवी दिल्लीत एआय समिटच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची विविध देशांच्या नेत्यांशी चर्चा

- विश्वास आणि मजबूत स्थिती हे भारताच्या व्यापार करारांचे आधारस्तंभ असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांचं प्रतिपादन

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत नेदरलँडसबरोबरच्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताची खराब सुरुवात

**<><><><><>**

राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकांची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगानं आज केली. यात राज्यातल्या ७ जागांचा समावेश आहे.

शरद पवार, रामदास आठवले, डॉ.भागवत कराड, डॉ.फौजिया खान, धैर्यशील पाटील, रजनी पाटील आणि प्रियंका चतुर्वेदी, या सात सदस्यांचा कार्यकाळ येत्या २ एप्रिल रोजी संपणार आहे. या रिक्त जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीची अधिसूचना २६ फेब्रुवारी रोजी जारी केली जाईल. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ५ मार्च तर ६ मार्च ला उमेदवारी अर्जांची छाननी केली जाईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ९ मार्चपर्यंत आहे. १६ मार्चला सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होईल आणि त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार आहे.

महाराष्ट्राबरोबरच ओदिशा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतही राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या जागांसाठी निवडणूक होणार आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत एआय समिटच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज विविध देशांच्या नेत्यांशी चर्चा केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्पेनचे राष्ट्राध्यक्ष पेद्रो सांचेझ यांची आज नवी दिल्लीत हैदराबाद हाऊसमधे भेट झाली. भारत आणि स्पेनमधले संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने ही भेट महत्त्वाची होती. व्यापार आणि अर्थव्यवस्था, नवोन्मेष, आरोग्य, पर्यावरण संरक्षणाविषयीचा कृती कार्यक्रम, शिक्षण आदी मुद्द्यांवर या भेटीत चर्चा झाल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं.

मोदी यांनी फिनलँडचे प्रधानमंत्री एँती पेट्टारी ओर्पो यांच्याशीही चर्चा केली. एआय संशोधन आणि नवोन्मेष तसंच द्विपक्षीय संबंध बळकट करण्यासाठी भारतीय प्रतिभेचा कसा  उपयोग होईल यावर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. भारत - फिनलँड दरम्यानचा व्यापार दुप्पट करून आर्थिक संबंधांना चालना देण्याचं उद्दिष्ट असल्याचंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

तर नवोन्मेषी सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे एआयच्या माध्यमातून शाश्वत विकास साधता येऊ शकतो असं फिनलँडचे प्रधानमंत्री एँती पेट्टारी ओर्पो म्हणाले.

त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी सर्बियाचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर वुसिक यांच्याशी चर्चा केली.  व्यापार, गुंतवणूक, एआय, पर्यटण या क्षेत्रात द्विपक्षीय संबंध बळकट करण्याविषयी दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. प्रधानमंत्र्यांनी एस्टोनियाचे राष्ट्राध्यक्ष अलर करीस यांच्याशीही चर्चा केली.

**<><><><><>**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या इंडिया एआय समिटसाठी देशोदेशीचे नेते भारतात येत आहेत. स्पेनचे राष्ट्राध्यक्ष पेद्रो सांचेझ, सेशेल्सचे उप राष्ट्राध्यक्ष सेबेस्टियन पिल्लय आणि मॉरिशसचे प्रधानमंत्री डॉक्टर नवीनचंद्र रामगुलाम एआय समिटसाठी नवी दिल्लीत पोहोचले. भारत-स्पेनच्या संस्कृती, पर्यटन आणि एआय संदर्भातल्या द्वैवार्षिक उत्सवांना सांचेझ यांच्या भेटीमुळे चालना मिळेल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटलं आहे.

स्लोवोक रिपब्लिकचे राष्ट्राध्यक्ष पीटर पेलेग्रीनी यांचंही आज नवी दिल्लीत आगमन झालं. नेदरलँडचे प्रधानमंत्री डीक स्कूफ, कझाकीस्तानचे प्रधानमंत्री ओलझास बेकटेनोव हेही एआय समिटसाठी दिल्लीत आले आहेत.

<><><><><>

विश्वास आणि मजबूत स्थिती हे भारताच्या व्यापार करारांचे दोन आधारस्तंभ आहेत, असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत जागतिक आर्थिक सहकार्य शिखर परिषदेत उद्योग जगतातले नेते आणि जागतिक भागधारकांना संबोधित करत होते. भारत युती आमि मैत्री निर्माण करतानाच आपल्या व्यापार आणि गुंतवणुकीच्या आवश्यकता उर्वरित जगापुढं नीट मांडण्यात आघाडीवर आहे, असं ते म्हणाले.

भारताच्या अमेरिकेशी प्रस्तावित व्यापार कराराचं अंतीम स्वरुप जाहीर केल्यानंतर त्याबाबत शेतकऱ्यांकडून एकही तक्रार येणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. शेतकरी, लघु आणि सूक्ष्म उद्योग, मच्छीमार, आणि नोकऱ्या यासारखी संवेदनशील क्षेत्र ही या करारतल्या चर्चेच्या केंद्रस्थानी असून, दुग्धोत्पादन क्षेत्र कोणत्याही करारात खुलं केलेलं नाही, असं गोयल यांनी सांगितलं.

<><><><><>

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज उत्पादन अभियांत्रिकी तंत्रज्ञानासाठी भारताच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्राधान्याची

रुपरेषा मांडली. नवी दिल्ली इंडिया एआय समिटमधे उद्योजक, जागतिक पातळीवरचे शिक्षणतज्ज्ञ, धोरणकर्ते आणि तंत्रज्ञांच्या बैठकीच्या अध्यक्षस्थान आज त्यांनी भूषवलं. यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केलं. एआय हे विकसित देश होण्याच्या भारताच्या प्रवासातील पायाभूत खांब आहे, असं वैष्णव यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज अहमदाबाद इथं अ गटात भारताचा सामना नेदरलँडसबरोबर सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतली. मात्र भारताची सुरुवात खराब झाली. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १३ षटकात ३ बाद १०८ धावा झाल्या होत्या.

अ गटातच आज श्रीलंकेत कोलंबो इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात पाकिस्ताननं नामिबियावर १०२ धावांनी विजय मिळवला. पाकिस्ताननं २० षटकात ३ गडी गमावून १९९ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना नामिबियाचा संघ १८ व्या षटकातच ९७ धावात गारद झाला.

ड गटात दिल्लीत झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं संयुक्त अरब अमिरातीवर ६ गडी ४० चेंडू राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना संयुक्त अरब अमिरातीनं २० षटकात ६ गडी गमावून १२२ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेनं ही धावसंख्या ४ गड्यांच्या मोबदल्यात १३ षटकं आणि २ चेंडूत पार केली.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत पूर्व विजेत्या बंगालला हरवून जम्मू काश्मीरचा संघ प्रथमच उपांत्यफेरीत पोहोचला आहे. पश्चिम बंगालमधे कल्याणी इथं आज संपलेल्या या सामन्यात बंगालच्या संघाने विजयासाठी १२६ धावांचं आव्हान जम्मूकाश्मीरला दिलं होतं. ते ३४ षटकं आणि ४ चेंडूत ४ गडी गमावून जम्मूकाश्मीरने पूर्ण केलं.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज नॉर्वेचे प्रधानमंत्री जोनास गॅहर स्टोरे यांच्याशी भेट घेऊन भारत आणि मुक्त व्यापार कराराच्या अंमलबजावणीवर चर्चा केली. या बैठकीत तंत्रज्ञान उत्पादन, कार्बन निर्मिती आणि साठवणूक, स्टार्टअप्स, सेमीकंडक्टर्स, अक्षय्य उर्जा आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रात भागीदारी वाढवण्याविषयी चर्चा झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आगामी नॉर्वे दौऱ्याने दोन्ही देशांमधलं सहकार्य वाढीला लागेल, असा विश्वास स्टोरे यांनी व्यक्त केला.

<><><><><>

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर तयार होणाऱ्या फेडएक्स टर्मिनल हबमुळे राज्यातल्या मालवाहतुकीला चालना मिळेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं. या हबचं भूमिपूजन आज त्यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. देशाची आर्थिक, व्यापारी तसंच मनोरंजन क्षेत्राची राजधानी असणाऱ्या मुंबई एमएमआर क्षेत्रात हे विमानतळ असल्याने भारताच्या भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचं असल्याचं ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

वापरून झालेल्या पेट प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करून रिसायकल करण्यासाठी महाराष्ट्रातल्या ९ शहरांमधे महा -आर- पेट मोहीम राबवण्यात येणार आहे. मुंबई क्लायमेट वीक दरम्यान राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत याबाबतच्या समझोता करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. त्यानुसार हिंदुस्तान कोकाकोला बेव्हरेजेस ही कंपनी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड आणि पालघर इथं ही मोहीम राबवणार आहे.

राज्याच्या हवामानविषयक आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी क्लायमेट ट्रेड या कंपनीशी देखील करार करण्यात आला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर बनले आहेत, बेरोजगारी वाढली आहे, महिला अत्याचाराचं प्रमाण वाढलं आहे, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला आहे, मात्र केंद्र आणि राज्यातलं भाजपा सरकार केवळ राजकारण करत असून या प्रश्नांकडे सरकारचं बिलकुल लक्ष नाही अशी टीका काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी केली. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते.

काँग्रेस पक्ष जनतेचे प्रश्न घेऊन राज्यभरात आंदोलनं, मोर्चे काढून सरकारला जाब विचारणार असल्याचं चेन्निथला यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेत भाजपाच्या ९ नगरसेवकांनी वेगळा गट स्थापन करुन महापौर - उपमहापौरपदाच्या निवडणुकीत काँग्रेस प्रणित भिवंडी सेक्युलर आघाडीला पाठिंबा दिला आहे.  महानगरपालिकेत काँग्रेसचे सर्वात जास्त ३० नगरसेवक आहेत. भाजपाचे उमेदवार २२ ठिकाणी निवडून आले, परंतु त्यातले ९ जण  फुटले आहेत, असं काँग्रेसच्या पदाधिकाऱ्याने सांगितलं.

**<><><><><>**

माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघाताची चौकशी पूर्ण होईपर्यंत नागरी हवाई वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांना पदावरून दूर करावं, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज  मुंबईत वार्ताहर परिषदेत केली.

**//<><><><><>//**